कोकणसाद शनिवार, दि. ८ ऑक्टोबर २०२२



एनसीसी युनिफॉर्म कापड व इतर साहित्य वाटप करताना सुभेदार मेजर दिनेश गेडाम, प्राचार्य डॉ. सुभाष सावंत व इतर.

# हळबे महाविद्यालयात 'एनसीसी'बाबत मार्गदर्शन

दोडामार्ग : येथील लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयात ५८ महाराष्ट्र बटालियनतर्फे महाविद्यालयातील प्रथम वर्षात 'एनसीसी'मध्ये प्रवेश घेतलेल्या एकूण ३६ विद्यार्थ्यांना एनसीसी युनिफॉर्मसाठी कापडाचे वाटप करण्यात आले. यावेळी सुभेदार मेजर दिनेश गेडाम यांनी विद्यार्थ्यांना 'एनसीसी' मधून करियरच्या संधी, विविध शिष्यवृत्ती तसेच 'एनसीसी' चे महत्व यावर मार्गदर्शन केले.

एनसीसीमधून देशसेवेची संधी मिळते. तसेच यामधून विद्यार्थ्यांना शिस्त लागून त्याचा फायदा त्यांना भविष्यातील करियरसाठी निश्चित होतो. विद्यार्थ्यांना 'एनसीसी'मधून राष्ट्रीय पातळीवर असलेल्या शिष्यवृत्ती तसेच विविध कॅम्प व त्याचे फायदे याबद्दल माहिती दिली. याप्रसंगी एनसीसी युनिफॉर्मचे कापड तसेच इतर साहित्य वाटप करण्यात आले.

या प्रसंगी सुभेदार टी. एफ. खैरनार, हवालदार जगदीश भाई तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष सावंत व एनसीसी चे इनचार्ज सी. टी. ओ. प्रा. डॉ. एस. एस. पाडगांवकर उपस्थित होते.